# वसई-विरार शहर महानगरपालिका

## अनधिकृत इमारती बाबत

## जाहिर सूचना

राज्य शासनाने दि.३१ ऑगस्ट १९८८ रोजी अधिसूचनेद्वारे वसई-विरार उपप्रदेशाची निर्मिती केली, तत्पूर्वी जिल्हाधिकारी ठाणे यांना विकास परवानगी देण्यांचे अधिकार होते. त्यानंतर ३१ ऑगस्ट १९८८ ते १४ मे १९९० पर्यंत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण विषेश नियोजन प्राधिकरण म्हणून कार्यरत होते. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने काही प्रमाणात विकास परवानगी दिलेल्या आहेत.

तसेच सदर उपप्रदेशासाठी शासनाने १४ मे १९९० रोजी विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन सिडकोची नियुक्ती केली. दि.६ जुलै २०१० पर्यंत सिडको कार्यरत होती व सिडको कडून मोठया प्रमाणावर विकास परवानगी देण्यांत आलेल्या आहेत. त्यानंतर ५३ गावे आणि ४ नगरपरिषद मिळुन वसई-विरार शहर महानगरपालिका अस्तित्वात आली आणि दि.७ जुलै २०१० पासून वसई विरार शहर महागरपालिकेला नियोजन प्राधिकरणाचे अधिकार प्राप्त झाले.

तसेच शासनाने दि.२१ फेब्रवारी २०१५ रोजी वसई-विरार उपप्रदेशातील वगळलेल्या उर्वरीत २१ गावांकरिता वसई-विरार शहर महानगरपालिकेची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणुन नेमणुक केलेली आहे.

परंतु असे निदर्शनास आले की, काही विकासक मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको व वसई विरार शहर महानगरपालिकेच्या बोगस परवानगीच्या आधारावर अनधिकृत घरे लोकांना विकत आहेत. म्हणुन आम्ही लोकहितासाठी जनतेस निवेदन करतो की,

**"महानगरपालिका हद्दीतील कोणतीही वास्तु/घर/ दुकान/कारखाना इत्यादी विकत घेण्यापूर्वी विकासकाकडून रितसर घेतलेल्या परवानगीची कागदपत्रे तपासून वसई-विरार शहर महानगरपालिकेमध्ये संपर्क साधुन उल्लेखीत वास्तु/घर/दुकान/कारखाना इत्यादी च्या रितसर परवानगीची खात्री करुन घ्यावी व त्या नंतरच खरेदीचे व्यवहार करावे"** तसेच अनधिकृत बांधकामाच्या जनजागृतीबाबत Facebook-https://www.facebook.com/१०००१०५६७९३२९६१/videos/५३९२५४९९६४३६७६०/?id =१०००१०५६७९३२९६१ तसेच YouTube https:// www. youtube.com/watchtv=kpx wfgwTvi या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द केलेली आहे.

अशा प्रकारे वरील निवेदना विरुध्द केलेल्या कुठल्याही व्यवहाराबाबत वसई-विरार शहर महानगरपालिका जबाबदार राहणार नाही. तसेच अशा अनधिकृत इमारतींवर कार्यवाही करुन केव्हाही निष्काशित करण्याचे अधिकार वसई-विरार शहर महानगरपालिकेला आहेत, याची नोंद घ्यावी.

अनधिकृतपणे बांधलेल्या इमारतीवर मालमत्ताकर महानगरपालिका लावते, त्यामुळे ते अधिकृत होत नाही. परंतु सदर बांधकाम केव्हाही तोडले जाऊ शकते. अनधिकृत इमारतीस महानगरपालिकेमार्फत नळ जोडणी दिल्या जात नाहीत तसेच वीज जोडणी देवू नये म्हणुन संबंधित विभागांना कळविण्यांत आलेले आहे.

आयुक्त,
(सतिश लोखंडे)
वसई-विरार शहर महानगरपालिका.

जा.क्र.व.वि.श.म/न.र/शा./१९३२/२०१७-१८
वसई-विरार शहर महानगरपालिका
नगररचना विभाग, मुख्यालय, तिसरा माळा,
बाजार वार्ड,विरार (पू).
दिनांक-